प्रेसनोट

**"कोकेनची विक्री करणारा नायजेरीयन आरोपीकडुन कोकेन या अंमली पदार्थाचा मोठा साठा जप्त" गुन्हे शाखेची कारवाई**

गुन्हे शाखेतील आधिकारी यांना माहीती मिळाली की, बाणेर औंध परिसरात एक नायजेरीयन इसम **कोकेन** सारखे अंमली पदार्थ जवळ बाळगुन त्यांची पुणे शहरात तरुण तरुणीना विक्री करतो. अशी माहिती मिळाल्याने मा. पोलीस आयुक्त पुणे शहर यांचे निर्देशानुसार या संदर्भात अधिक माहीती प्राप्त करुन श्री अशोक मोराळे, अपर पोलीस आयुक्त, गुन्हे पुणे श्री शिरीष सरदेशपांडे पो उप आयुक्त गुन्हे व श्री समीर शेख, सहा पोलीस आयुक्त गुन्हे -१ यांचे मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री राजेंद्र **मोहिते, सौ** मनिषा झेंडे, श्री. गजानन पवार यांचे अधिपत्याखाली पथक तयार करण्यात आले. या पथकाने दि. २८/६/२०१९ रोजी पहाटे बाणेर-पुणे येथील कळमकर चौकाकडे जाणारे रोडवर, सापळा रचला. त्यावेळी सिल्वर रंगाची होंडा सीआरव्ही कार नंबर एम एच ४३ आर ९२४५ मधील नायेजरीयन इसम पोलीस टिमला पाहुन पळुन जाणेचा प्रयत्न करीत असताना दिसुन आला. त्यास पोलीस पथकाचे मदतीने ताब्यात घेण्यात आले. सदर नायजेरियन इसमाकडे सखोल चौकशी करता त्याचे नाव **फॉलरिन अब्दुलअझीज अन्डोई**, वय ४७ वर्षे, सध्या रा.बि विंग,फ्लॅट नंबर ६०२, कलाकृती सोसायटी,बाणेर पुणे मुळ रा. नायजेरिया असे असल्याचे समजले. त्याची व कारची झडती घेतली असता त्याचे ताब्यामध्ये खालील प्रमाणे मुद्देमाल व रोख रक्कम मिळाली आहे.

१. पारदर्शक प्लॅस्टीक पिशवीमध्ये **"कोकेन"** पावडर ४८८ ग्रॅम ४४० मि. ग्रॅ. कि रु. ४८,६२,८८०/-
२. रोख **रक्कम** ८,३९, ४९०/- भारतीय व परदेशी चलन.
३. सॅमसंग कंपनीचे ३ **मोबाईल** हॅंडसेट
४. ईलेक्ट्रॉनिक वजन काटा, पावडर बांधण्याकरीता आवश्यक असलेल्या प्लॅस्टीक पिशव्या,
५. वेगवेगळया कंपनीच्या **विदेशी मदयाच्या** एकुण १२ सिलबंद बाटल्या,
६. होंडा कंपनीची सीआरव्ही कार नंबर एम एच ४३ आर ९२४५

असा एकुण सर्व मिळुन रु ६३,१०,२२९ /- किमतीचा मुदेमाल त्याचे ताब्यातुन जप्त करण्यात आलेला आहे.

त्याचेकडे चौकशी करता पुणे शहर परिसरात बाणेर, औंध, कोंढवा, एनआयबीएम रोड, कोरेगावपार्क, कॅंप, कल्याणी नगर इत्यादी उच्चभ्रु वस्तीमध्ये कारमध्ये फिरुन तसेच त्याचे इतर साथीदाराचे मदतीने कोकेन या अंमली पदार्थाची विक्री करीत असल्याचे निष्पन्न झाले आहे. त्याला मदत करणारे साथीदारांचा शोध चालु आहे.

नमुद कारवाई ही वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री राजेंद्र मोहिते, सौ मनिषा झेंडे, गजानन पवार यांचे अधिपत्याखाली पोलीस उप-निरीक्षक निखील पवार, पोलीस कर्मचारी अविनाश शिंदे, प्रविण शिर्के, दिलीप जोशी, साबळे, राहिगुडे, मगर, साळुंके, बागवान, कोकरे, वग्गु, शेख, छडीदार, चंदन, महाजन, किरण अब्दागिरे, मोहिते, मदने यांनी केली. गुन्हयाचा पुढील तपास वरिष्ठ पो निरीक्षक श्री राजेंद्र मोहिते हे करीत आहे.

